# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२११३२७/२१/अ.क्र.५८५८/२४/०१**

**श्री. शेख मुश्ताक युसुफ**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी**
औषध भांडार विभाग, सर. जे.जी. समूह रुग्णालये,
भायखळा, मुंबई – ४०० ००८.

**जन माहिती अधिकारी तथा औषध निर्माता प्रमुख वर्ग-२**
औषध भांडार विभाग, सर. जे.जी. समूह रुग्णालये,
भायखळा, मुंबई – ४०० ००८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहयोगी प्राध्यापक (तदर्थ)**
औषध भांडार विभाग, सर. जे.जी. समूह रुग्णालये,
भायखळा, मुंबई – ४०० ००८.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १९.११.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. ०६.११.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे)

विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०९.२०२० | - | २१.१०.२०२० | ११.११.२०२० |

अपिलकर्तांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि. ११.११.२०२० रोजीचे आदेश संलग्न करुन दि.२४.०३.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. २१.०९.२०२० अन्वये "Kindly provide stamped signed and certified true copies or attested copies or authenticated copies of information provided on this RTI Application. Kindly provide the information point wise and in English language as far as possible as required under section 6(3), 4(3) and 7(9) of the RTI Act, 2005" याबाबत खालीलप्रमाणे मुद्येनिहाय माहितीची मागणी केलेली आहे.

1. "COPIES OF THE APPROVED SANCTIONED LIST OF ORDER PLACED ITEM WISE ALONG WITH ITEM WISE CONSUMPTION, PATIENT WISE CONSUMPTION, ETC IN CHART FORM OF THE SAID STORE DURING ABOVEMENTIONED PERIOD UNDER MJPJAY SCHEME ALONG WITH ENTIRE RECORDS AND PROCEEDINGS.

2. KINDLY PROVIDE THE LIST OF CRITERIA BY WHICH THE SAID STORE AWARDED TENDER FLOATED AND AWARDED UNDER FUNDS ARE ALLOCATED.
3. COMPARATIVE STATEMENTS.
4. COPIES OF TENDER NOTICE:

A. ONLINE THAN SCREENSHOTS OF MESSAGES SEND ON WHATSAPP WITH DATE AND THER DETAILS.

B. OFFLINE THAN NEWSPAPER, PRCEDURE, ETC DETAILS.

5. COPIES OF THE APPRVOED SANCTIONED LIST OF ITEMS FOR WHICH PAYMENTS PAID DURING PANDEMIC BY THE SAID STORE ALONG OFFICE NOTES/COMMENTS.
6. KINDLY PROVIDE A COPY OF THE PARAMETERS SET TO DECIDE THE SAID STORE.
7. KINDLY PROVIDE COPIES OF ALL THE GOVT. RESOLUTION RULES AND REGULATIONS, LAWS, NOTIFICATIONS, CIRCULAR, ETC CONCERNING THE SAID STORE.
8. PLEASE PROVIDE COPY OF THE RULES / LAW ETC TO BE FOLLOWED FOR THE SAID STORE BE SOUGHT TO BE BY PASSED BY THE CONCERNED GOVERNMENT AND USED OR DIVERTED FOR ANY OTHER REQUIRED. ALSO PROVIDE COPY OF THE PROCEDURE REQUIRED TO BE FOLLOWED FOR SUCH DIVERSION OF FUNDS.
9. COPY OF LIST OF NAME OF CHIEF PHARMACIST FOR THE SAID STORE DURING ABOVEMENTIONED PERIOD.
10. COPIES OF DETAILS REPORT INCLUDING ENTIRE RECORDS AND PROCEEDINGS OF :

a. NO.MS/JJH/QT/539/2019 DATED 14/01/2019.

b. NO.SS/JJH/QT/202/2019 DATED 14/01/2019.

c. NO.MS/JJH/QT/542/2019 DATED 13/02/2019.

d. NO.SS/JJH/QT/NEURO/422/2019 DATED 07/08/2019.

e. NO.SS/JJH/QT/NEURO/588/2019 DATED 18/12/2019."

जन माहिती अधिकारींनी उत्तर न दिल्याने प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहयोगी प्राध्यापक (तदर्थ) औषध भांडार विभाग यांनी दि. ११.११.२०२० रोजी "जन माहिती अधिकारी तथा औषध निर्माता प्रमुख वर्ग-२ यांनी अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसाच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी" असे आदेश पारित केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. २४.०३.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा औषध निर्माता प्रमुख वर्ग-२ यांचे उत्तर न प्राप्त झाल्यामुळे प्रथम अपील अर्ज दाखल केला असून प्रथम अपील आदेश अभिलेखात उपलब्ध आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहयोगी प्राध्यापक (तदर्थ) औषध भांडार विभाग यांनी "जन माहिती अधिकारी तथा औषध निर्माता प्रमुख वर्ग-२ यांनी अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसाच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी" असे आदेश पारित केले आहे.

या प्रकरणी कोणतेही आदेश पारीत करण्यापूर्वी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. या प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. सबब आयोग पुढील आदेश देत आहे :-

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १७.१२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

19-11-2024

मुंबई
दिनांक :१९.११.२०२४

( डॉ.प्रदीप व्यास )
राज्य मुख्य माहिती आयुक्त